महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४००००१
दूरध्वनी क्र:-०२२-२२८३०२०० Email ID : soyojana11.rdd-mh@nic.in

क्र.तीर्थवि-२०२४/प्र.क्र.३०/यो-११ दि: ०९/०३/२०२४

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

विषय:- ग्रामीण तीर्थक्षेत्रांना ब- वर्ग देणे व निधीची मागणी करताना घ्यावयाच्या काळजीबाबत.

संदर्भ: १. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दि. १६ नोव्हेंबर, २०१२.
२. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दि. २८ डिसेंबर, २०२३.

महोदय,

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब-वर्ग)" अंतर्गत मा. प्रधान सचिव (ग्रामविकास) तथा अध्यक्ष, राज्य निकष समिती यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावांना "ब-वर्ग" दर्जा व गट "ब-दर्जा" प्राप्त झालेल्या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी प्रस्तावित केलेल्या सुविधांच्या अंदाजपत्रकांना वर नमूद केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्तींचे पालन करून प्रशासकीय मान्यता देण्याची शिफारस केली जाते.

०२. अशा प्रस्तावांना तपासणी करुन मान्यता देणे सोपे व्हावे यासाठी यापुढे, ग्रामीण भागातील तीर्थस्थळास "ब-वर्ग" दर्जा देण्यासाठी शासनास सादर करण्यात येणारे प्रस्ताव "प्रश्नावली-१" सह सादर करण्यात यावीत. तसेच "ब-वर्ग" दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी करावयाच्या सुविधांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनास सादर करण्यात येणारे अंदाजपत्रके "प्रश्नावली-२" सह सादर करण्यात यावीत. तसेच सादर करण्यात येणारे अंदाजपत्रके हि कामाच्या सविस्तर तपशीलासह व एका तीर्थक्षेत्रासाठी एकच अंदाजपत्रक सादर करण्याची दक्षता घ्यावी. या प्रश्नावलींसह प्रस्ताव नसल्यास, ते प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत याची, कृपया नोंद घ्यावी.
प्रश्नावली-१ व प्रश्नावली-२ चा प्रती सोबत जोडल्या आहेत.

आपला,

(का.गो.वळवी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

आवश्यक कार्यवाहीसाठी:
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, सर्व.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
विभागीय कार्यालय, कोल्हापूर
Maharashtra Energy Development Agency (MEDA)
(Government of Maharashtra Institution)
Divisional Office, Kolhapur

२०२४/विकाको/तांत्रिक/कार्या-१/ 766 दि. २७/०९/२०२४

प्रति,
**ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रामपंचायत (यादीप्रमाणे)**

**विषय- कागल, गडहिंग्लज व आजरा तालुक्यातील विविध ७८ ग्रामपंचायतींच्या दलित वस्तींमध्ये सौर हायमास्ट प्रकल्प आस्थापित करणेबाबत..**

संदर्भ- सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर यांचे पत्र क्र. जा.क्र.सआसकको/अजाउयो/नविन व नविनीकरण ऊर्जा/२०२४-२५/३३८८दि. ०७/०८/२०२४

उपरोक्त विषयी सादर करण्यात येते की, कागल, गडहिंग्लज व आजरा तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींच्या दलित वस्तींमध्ये सौर हायमास्ट प्रकल्प आस्थापित करणेचे काम संदर्भिय पत्रान्वये प्रस्तावित केले आहे.

त्याअनुषंगाने सादर करण्यात येते की, सदर कामासंबंधी खालीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास अद्याप प्राप्त झालेली नाहीत. तेव्हा सदर खालीलप्रमाणे नमूद कागदपत्रे या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावीत.

१) ग्रामपंचायत ठराव (सौर हायमास्ट प्रकल्पासाठी निश्चित केलेल्या ठिकाणाचा उल्लेख आवश्यक)

२) सौर हायमास्ट प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीचे हमीपत्र

३) सौर हायमास्ट प्रकल्पासाठी निश्चित केलेली जागा ही सावली विरहीत, ग्रामपंचायत मालकीची आणि निर्विवाद असल्याचा दाखला.

४) सौर हायमास्ट प्रकल्पासाठी निश्चित केलेले ठिकाण हे दलित वस्तीमधील असलेबाबतचा दाखला

५) प्रस्तावित काम यापूर्वी कोणत्याही निधीमधून प्रस्तावित केले नसल्याचे व सदर काम नवीन असल्याचा दाखला

६) सौर हायमास्ट प्रकल्पासाठी निश्चित केलेल्या ठिकाणाची नमूना २६ मध्ये नोंद असल्याची प्रत

७) सौर हायमास्ट प्रकल्पासाठी निश्चित केलेल्या ठिकाणाचा अंशाक्ष व रेखांशासहीत छायाचित्र

८) समजुतीचा नकाशा

तेव्हा याव्दारे आपणास कळविण्यात येते वरीलप्रमाणे नमूद आवश्यक सर्व कागदपत्रे या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावीत, जेणेकरुन प्रस्तावित कामासंबंधी पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

विभागीय महाव्यवस्थापक करिता
महाऊर्जा, विभागीय कार्यालय, कोल्हापूर

विभागीय कार्यालय : सि. स. नं. २४९/अ-१/५५, ई वॉर्ड, म्हाडा कॉम्प्लेक्स, नागाळा पार्क, जिल्हा परिषदेजवळ, कोल्हापूर - ४१६००३
www.mahaurja.com Email : medakolhapur@mahaurja.com Ph : (0231) 2680009